# कार्यालयीन परिपत्रक

माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. : 910
दिनांक : 14/1/2021

**विषय : पुणे महानगरपालिकेच्या विकास कामांच्या नोंदी GIS प्रणालीच्या Base Map मध्ये करणेबाबत.**

**संदर्भ : १. मा. अति महापालिका आयुक्त (वि) कार्यालय यांचे जावक क्र. अतिमआ(वि) कार्यालय यांचे जा.क्र. अतिमआ (वि)/मआ/५३९९ दि. १४/०२/२०१८ रोजीच्या सूचना.**
**२. मा. अति महापालिका आयुक्त (ज) कार्यालय यांचे जावक क्र. अतिमआ(ज)/६७१ दि. १४/५/२०१९ रोजीचे कार्यालयीन आदेश.**
**३. मा. अति महापालिका आयुक्त (ज) व मा. अति महापालिका आयुक्त (वि) यांचे दि. १६/११/२०१९ रोजी खातेप्रमुख आढावा बैठकीमध्ये दिलेले आदेश.**

पुणे महानगरपालिकेच्या विकास कामांच्या अद्यावत माहितीच्या नोंदी करणेकरिता टेंडर युटीलिटी इंटरप्राईज जी.आय.एस प्रणालीच्या माध्यमातून विकसित करणेत आलेली आहे. जेणेकरून पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील विकास कामांमध्ये प्रशासकीय निर्णय घेताना गती येणार असून त्याबाबतची भौगोलिक माहिती पुणे मनपाच्या अधिकाऱ्यांना त्वरित प्राप्त होणार असल्याने प्रशासकीय निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

तदनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या विकास कामांच्या अद्यावत माहितीच्या नोंदी सर्व संबंधित विभागांनी/खाते/क्षेत्रिय कार्यालय यांनी GIS प्रणालीच्या Base Map Layers वर करून घ्यावयाच्या असून सर्व संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुखांनी याची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचेमार्फत संदर्भांकित अन्वये आदेश देण्यात आले होते. तथापि विकास कामांच्या नोंदी GIS प्रणालीमध्ये होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

तसेच मा. महापालिका आयुक्त, मा. अति. महापालिका आयुक्त (वि,ज,ई) यांची सर्व खातेप्रमुख यांचे समवेत झालेल्या दि. १६/१२/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या विकास कामांच्या नोंदी GIS प्रणालीमध्ये करणेबाबत सूचना दिलेल्या आहे. तरी सर्व संबंधित विभागांनी/खाते/क्षेत्रिय कार्यालय यांनी याबाबत काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई)**
पुणे महानगरपालिका

**प्रत:** सर्व संबंधित खातेप्रमुख/ विभागप्रमुख, उप आयुक्त (परिमंडळ १ ते ५), महापालिका सहायक आयुक्त (सर्व क्षेत्रिय कार्यालय) पुणे महानगरपालिका.
यांचेकडे कार्यवाहीसाठी........

Scanned with CamScanner